सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/२६८** **दि. १०/१०/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**विषय : नशामुक्त भारत अभियानावर महाविद्यालयस्तरावर चित्रकला, वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्याबाबत.**
**संदर्भ क्र. १. उशिसं/मवि – १/ मवि स्तरा वि. स्पर्धाचे आयोजन/ ई – २३०१२३७ दि. ०९ ऑक्टोबर, २०२५ रोजीचे पत्र.**
**२. समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचे सकआ/व्य.का/२०२५-२६/का-१७/२४१ दि. २६ सप्टेंबर, २०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचे सकआ/व्य.का/२०२५-२६/का-१७/२४१, दि. २६ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. १७ ऑगस्ट, २०११ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहिर करण्यात आलेले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने या कार्यालयामार्फत प्रत्येक जिल्हयात व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार करण्याकरिता विविध योजना/उपक्रम राबविण्यात येतात.

नजीकच्या कालावधीत केंद्रशासनाकडील मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृती योजना (NAPDDR) व नशामुक्त भारत अभियान (NMBA) अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्यसनापासुन दुर ठेवण्यासाठी शासन निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील विद्यार्थ्यांना आपल्यास्तरावर चित्रकला, वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन दि. २ ते २५ ऑक्टोंबर, २०२५ या कालावधीत करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत. या स्पर्धेत विजयी झालेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय विद्यार्थ्यांची नावे आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागामार्फत https://forms.gle/qP1mrY55dUnuo1Mq9 या गुगल फॉर्म वर दि. २५ ऑक्टोबर, २०२५ रोजी दु. ०१.०० वाजेपर्यंत पाठवण्यात यावीत.

कळावे, हि विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१**
Web : **www.dhepune.gov.in** E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.: उशिसं/मवि-१/मवि स्तरा वि.स्पर्धाचे आयोजन/ई- २३०१२३७ दि. /१० /२०२५

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी/अभिमत /स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे.

विषयः- आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या महाविद्यालयीन स्तरावर चित्रकला,वकृत्व तसेच निबंध स्पर्धांचे आयोजन करण्याबाबत.
संदर्भः- समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. जाक्र. सकआ/व्य.का/२०२५-२६ /का-१७/२४१/दि.२६.९.२०२५

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त विषयाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दि.१७ ऑगस्ट २०११ अन्वये व्यसनमुक्ती धोरण जाहिर केले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्हयात व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार करण्याकरिता विविध योजना तसेच उपक्रम राबविण्यात येतात. केंद्रशासनाकडील मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृती योजना (NAPDDR) (१००% केंद्र पुरस्कृत) केंद्रशासनाच्या योजनेअंतर्गत व नशामुक्त भारत अभियान (NMBA) अंतर्गत महाविद्यालयीन तरुण मुला- मुलींना व्यसनापासून दुर ठेवण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर दि.२ ऑक्टोंबर २०२५ ते दि.२५ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीमध्ये चित्रकला, वकृत्व तसेच निबंध स्पर्धांचे आयोजन करुन विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांची नावे दि.२५ ऑक्टोंबर २०२५ पर्यत समाज कल्याण आयुक्तालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने संदर्भांकित पत्रातील सूचनांनूसार कार्यवाही करुन स्पर्धेमध्ये अंतिम निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे आपल्या स्तरावरुन समाजकल्याण आयुक्तालय पुणे यांना कळविण्यात यावीत.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 09-10-2025 18:07:38

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३, चर्च रोड, पुणे ४११ ००१.
दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१३७०१९ ई-मेल-dao.socwelfare@gmail.com

जाक.सकआ/व्य.का/२०२५-२६/का-१७/२५१ दि.२६.०९.२०२५

शिक्षण संचालनालय,
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र ...-४११०१६
- 9 OCT 2025
आवक :
शाखा :-

प्रति,
मा.संचालक /सहसंचालक,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या महाविद्यालयीन स्तरावर चित्रकला,वकृत्व तसेच निबंध स्पर्धांचे आयोजन करण्याबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १७ ऑगस्ट,२०११ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहिर करण्यात आलेले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने या कार्यालयामार्फत प्रत्येक जिल्हयात व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार करण्याकरिता विविध योजना तसेच उपक्रम राबविण्यात येतात.

अलिकडील काळात केंद्रशासनाकडील मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृती योजना (NAPDDR) (१००% केंद्र पुरस्कृत ) केंद्रशासनाच्या योजनेअंतर्गत व नशामुक्त भारत अभियान (NMBA) अंतर्गत महाविद्यालयीन तरुण मुला-मुलींना व्यसनापासुन दुर ठेवण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर चित्रकला,वकृत्व तसेच निबंध स्पर्धांचे दिनांक २ व १५ ऑक्टोंबर,२०२५ या दिवशी आयोजन करण्यात येवुन स्पर्धेमार्फत विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर अंतिम निवड करुन प्रथम/व्दितीय/तृतीय क्रमांक देण्यात यावा व निवड झालेल्या विद्यार्थ्यांना या विभागामार्फत स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार असल्यामुळे तिन्ही स्पर्धेत राज्यस्तरावर प्रथम/व्दितीय/तृतीय क्रमांकावर विजयी ठरलेल्या विर्द्यार्थ्यांची नांवे दिनांक २५ ऑक्टोंबर,२०२५ पर्यंत आयुक्तालयास कळविण्यात यावीत ही विनंती.

आपली विश्वासू,
(दिपा मुधोळ-मुंडे) २९/९/२५
आयुक्त,समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य,पुणे.

सोबत : वेळ प्रपत्र

# प्रपत्र

| अक्र. | निबंध विषय | आयोजनाचा दिनांक |
|---|---|---|
| १ | तरुण/तरुणींचे मानसिक आरोग्य आणि व्यसन | दि. २ ते १० ऑक्टोंबर, २०२५ |
| २ | डिजिटल डिटॉक्स आणि स्क्रीन टाइमचे व्यवस्थापन एक आव्हान | |
| ३ | व्यसनाचा मानवी मेंदूवर होणारा परिणाम | |
| ४ | व्यसन देशाच्या भविष्यासाठी धोका | |
| ५ | व्यसनमुक्त समाजाचे माझे स्वप्न | |
| | **वकृत्व स्पर्धा विषय** | दि.१५ ऑक्टोंबर, २०२५ |
| १ | व्यसन हा एक सापळा आहे, त्याला बळी पडू नका. | |
| २ | ए.आय. आणि सोशल मीडिया आजच्या युगातील व्यसन बनत आहे. | |
| ३ | महाविद्यालये व्यसन रोखण्यास कशी मदत करू शकतात. | |
| ४ | आजची तरुणाई बदल घडवणारी आणि व्यसनाशी लढणारी. | |